# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

## परिपत्रक

क्र.एमपीएम/दोन/७४९३ दि.१०.०५.२००६

विषय :- निलंबित कर्मचाऱ्यांचे निलंबन सिमित करणे.

संदर्भ :- १) परिपत्रक क्र.साप्रवि/एमपीएम/४८०० दि.१८.११.२०००.
२) परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/३५०५ दि.२१.२.२००५.

---

दिनांक १८.११.२००० च्या क्र.साप्रवि/एमपीएम/४८०० च्या परिपत्रकात भ्रष्टाचार आणि फौजदारी गुन्ह्याखाली निलंबित असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा महानगरपालिका सेवेमध्ये पुन:स्थापनेसाठी विचार होऊ नये आणि न्यायालयीन प्रकरणांचा व पोलीस प्रकरणांचा पाठपुरावा संबंधित खाते प्रमुखांनी किंवा विधी अधिकारी यांनी वैयक्तिकरित्या करावा असे निर्देश देण्यात आले होते. असे असूनसुध्दा फौजदारी प्रकरणात निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्याविरुध्द न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा किंवा पोलिस प्रकरणांचा पाठपुरावा संबंधित खाते प्रमुख करीत नसल्यामुळे त्याप्रकरणाची सद्यस्थिती पुनर्विलोकन समितीस देण्यास ते असमर्थ ठरतात.

परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/३५०५ दिनांक २१.२.२००५ नुसार भ्रष्टाचार आणि फौजदारी प्रकरणात निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे मा.आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या पुनर्विलोकन समिती-१ च्या बैठकीपुढे ठेवावयाची आहेत. अशी प्रकरणे सादर करताना उपरोक्त परिच्छेद -१ मध्ये नमूद केलेल्या परिपत्रकातील निर्देशाचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे निलंबित असलेल्या कर्मचाऱ्याविरुध्द प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणांची आणि/अथवा पोलिस प्रकरणांची सद्यस्थिती संबंधित खाते प्रमुख देऊ शकत नाहीत. परिणामी अशा अर्धवट माहितीमुळे पुनर्विलोकन समिती त्यांच्या निलंबनाबाबत यथोचित निर्णय घेऊ शकत नाही. यास्तव भ्रष्टाचार व फौजदारी गुन्ह्याखाली निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द करावयाच्या कार्यप्रणालीबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) भ्रष्टाचार किंवा फौजदारी प्रकरणात निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणांचा व पोलिस प्रकरणांचा पाठपुरावा संबंधित खाते प्रमुखांनी वैयक्तिकरित्या करावा व प्रकरणाची सद्यस्थिती अवगत करुन घ्यावी.

२) भविष्यात जर एखाद्या महापालिका कर्मचाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविला व जर सदर गुन्हा कर्मचाऱ्याच्या महानगरपालिका कर्तव्याशी निगडीत असेल तर सोबत स्वतंत्रपणे प्राथमिक चौकशी/विभागीय चौकशीदेखील त्वरीत सुरु करावी, जेणेकरुन विभागीय चौकशीचा निर्णय सहा महिन्याच्या आत मिळवता येईल.

३) ज्या निलंबित कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय झालेले आहे किंवा ज्यांच्या वयाची ५५ वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा कर्मचाऱ्यांविरुध्द परिपत्रक क्र.एमपीएम/६१६१ दिनांक २०.१२.२००० नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) परिपत्रक क्रमांक एमपीएम/दोन/३५०५ दिनांक २१.२.२००५ मधील निर्देशानुसार फौजदारी गुन्ह्याखाली निलंबित कर्मचाऱ्यांची प्रकरणे पुनर्विलोकन समिती-१ पुढे सादर करण्यात यावीत. अशी प्रकरणे सादर करताना प्रत्येक निलंबित कर्मचाऱ्याची परिपूर्ण माहिती, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/संबंधित पोलिस

ठाण्याकडून प्राप्त झालेला प्रकरणातील सद्यस्थितीबाबतचा अहवाल व इतर आवश्यक माहिती प्राप्त करून परिपत्रक क्र.साप्रवि/५५८७ दिनांक १५.१.९९ मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संबंधित प्रकरणे वगळता अन्य फौजदारी आरोपाखालील प्रकरणी खालच्या न्यायालयात दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांनी सदर निर्णयाविरुध्द अपिल करण्याची मुदत संपेपर्यंत अथवा अपिल केले असेल तर पहिल्या अपिल कोर्टातील निर्णयाची वाट न पहाता, न्यायालयाने त्यांना दोषी ठरविल्याची माहिती लेखी स्वरूपात प्राप्त होताच त्यांना सेवेतून काढून टाकण्यासाठीचा / बडतर्फ करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधित खाते प्रमुखांनी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांना त्वरीत सादर करावा व आदेश प्राप्त होताच पुढील कार्यवाही त्वरेने करावी. कर्मचारी अपिलात निर्दोष असल्याचे सिध्द झाल्यास व त्याबाबत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाणार नसल्यास कर्मचाऱ्याचे पूर्वी निर्गमित केलेले, सेवेतून काढून टाकल्याचे/बडतर्फीचे आदेश रद्द करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशासाठी योग्य तो प्रस्ताव खाते प्रमुखांनी प्रमुख अधिकारी (चौकशी) यांचेमार्फत सादर करावा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग प्रकरणी वरील कार्यवाही प्रमुख अधिकारी (चौकशी) यांनी परस्पर करावी.

६) वरील (५) मधील तत्वानुसारच व पध्दतीनुसारच खालच्या न्यायालयाने दोषमुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांबाबत शासनाकडून अपील करण्याची मुदत संपेपर्यंत वाट न पहाता, परिपत्रक क्र.एओ/जन/३७६ दिनांक ८.१०.१९८२ मध्ये विहित केलेली कार्यपध्दती अनुसरुन कर्मचाऱ्याला सक्षम अधिकाऱ्याच्या मंजूरीने कामावर हजर करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तथापि खालच्या न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द अपिल करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यास, कर्मचाऱ्याला पुन: निलंबित करावे किंवा कसे याचा निर्णय घेण्यासाठी कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्यांना सादर करावीत. मात्र सदर निलंबन सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशांनंतर म्हणजेच भविष्यकालीन प्रभावाने असेल याची नोंद घ्यावी. शासनाने केलेल्या अपीलात कर्मचारी दोषी असल्याचे आढळल्यास उपरोक्त (५) प्रमाणे कारवाई करण्यात यावी.

७) निलंबित कर्मचाऱ्यांना निर्वाह भत्याचे अधिदान सक्षम अधिकाऱ्याच्या मंजुरीने नियमितपणे त्यांच्या प्रकरणाचा अंतिम निकाल लागून त्याच्यावर अंतिम आदेश बजावेपर्यंत करण्यात यावे. यामध्ये कसूर झाल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सर्व खातेप्रमुख / सहाय्यक आयुक्त यांनी सदर आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| (एस.जे.बाबर) | (आर.आर.देशमाने) | (एस.एच.उज्जैनवाला) | (ए.जी.हिरे) | (सुब्रत रथो) | (जॉनी जोसेफ) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | प्रमुख अधिकारी (चौकशी) | कायदा अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) | आयुक्त |

साप्रवि/०३
२००६-०७

क्र.एमपीएम/दोना/७४९३
दि.१०.०५.२००६

प्रत : ——————————————————( जादा प्रतींसह ) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी कृपया रवाना.

प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचेकरिता.